जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

02 SEP 2022
लोकसत्ता

## वनस्पतीच्या आयुष्यात एकदाच बहर

# दुर्मीळ 'सेन्चुरी पाम' कोल्हापुरात फुलला !

दयानंद लिपारे, लोकसत्ता

**कोल्हापूर :** 'सेंच्युरी पाम' या ताडाच्या दुर्मीळ प्रजातीस कोल्हापुरात बहर आला आहे. २४ ते ८० वर्ष एवढे आयुष्य असलेल्या या वनस्पतीला तिच्या सबंध जीवनक्रमात एकदाच फुले येतात. फुले आल्यानंतर हे झाड वठून जाते. मुळात दुर्मीळ वनस्पती आणि तिचा हा दुर्मीळ बहर यामुळे वनस्पती प्रेमी आणि अभ्यासकांसाठी ही घटना विलक्षण मानली जाते. यामुळे हा बहर पाहण्यासाठी लोक सध्या गर्दी करत आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या 'लीड बॉटनिकल गार्डन'मध्ये या प्रजातीचे झाड २४ वर्षांपूर्वी लावण्यात आले. या वनस्पतीचे 'कोरिफा अम्राकुलीफ्लोरा' असे शास्त्रीय नाव आहे. सेन्चुरीऑन ट्री, तालेपाम, तालापॉटपाम, ताडपत्री अशा नावांनी देखील ही वनस्पती ओळखली जाते. कोरीफाच्या जगात पाच, तर भारतात तीन प्रजाती आढळतात.



शिवाजी विद्यापीठाच्या 'लीड बॉटनिकल गार्डन'मधील सेंच्युरी पामला रोपणानंतर २४ वर्षांनी प्रथमच फुलोरा आलेला आहे.

कोरिफा अम्राकुलीफ्लोरा हा एक देखणा विशाल ताड आहे. तो दक्षिण भारतातील घनदाट जंगलांमध्ये वाढतो. या प्रजातींचे आयुष्य २५ ते ८० वर्षापर्यंत असते. या वृक्षाचा फुलोरा सर्वात मोठा मानला जातो. तो ४ मीटर उंच आणि ४ मीटर लांब एवढा विस्तीर्ण असतो आणि त्यामध्ये लाखो फुले बहरतात. या फुलोऱ्यानंतर त्याच्या बिया तयार झाल्यानंतर वृक्ष वठून जातो. या वनस्पतीला तिच्या सबंध आयुष्यात एकदाच फुले येतात. यामुळे वनस्पती प्रेमी आणि अभ्यसकांसाठी ही घटना दुर्मीळ मानली जाते.

देखणी फुले, विस्तीर्ण बहर आणि दुर्मीळ घटना यामुळे हा बहर पाहण्यासाठी लोक गर्दी करत आहेत.

सन १९९८ मध्ये सावंतवाडी येथील सेंच्युरी पामला फुलोरा आल्यानंतर त्याच्या बिया शिवाजी विद्यापीठात आणल्या गेल्या. लीड बॉटनिकल गार्डनमध्ये त्यांची रोपे तयार करण्यात आली, असे ज्येष्ठ वनस्पतिशास्त्रज्ञ डॉ. श्रीरंग यादव यांनी गुरुवारी सांगितले.

### हस्तलिखित, मद्य आणि अलंकार

या ताडाची पाने हस्तलिखितासाठी वापरली जात असत. ताडाच्या रसापासून वाईनही बनवली जाते. स्थानिक लोक ताडाच्या पानांची छत्री करून वापरतात. अरब देशांमध्ये याच्या कठीण बियांपासून गळ्यामध्ये अलंकार म्हणून घालण्याच्या माळा बनवल्या जातात.

02 SEP 2022
पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरात प्रथमच 'सेंच्युरी पाम'ला फुलोरा

## शिवाजी विद्यापीठाच्या लीड बॉटेनिकल गार्डन स्थित; वनस्पती विश्वातील सर्वात मोठा फुलोरा



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या लीड बॉटेनिकल गार्डनमधील सेंच्युरी पामला रोपणानंतर २४ वर्षांनी प्रथमच फुलोरा आला आहे.**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सेंच्युरी पाम या ताडाच्या प्रजातीस सुमारे ८० वर्षांच्या आयुष्यात एकदाच येणारा फुलोरा हा वनस्पतींच्या विश्वामध्ये सर्वाधिक मोठा व तितकाच दुर्मीळ फुलोरा म्हणून ओळखला जातो. शिवाजी विद्यापीठाच्या लीड बॉटेनिकल गार्डनमध्ये या प्रजातीचे ताड २४ वर्षांपूर्वी लावण्यात आले. यंदा या वनस्पतीस मनमोहक फुलोरा आला आहे. वनस्पतीशास्त्रज्ञ व वनस्पतीप्रेमी यांना हा दुर्मीळ नजारा पाहण्याची ही एक संधी आहे, अशी माहिती ज्येष्ठ वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. श्रीरंग यादव यांनी दिली.

### बहुपयोगी सेंच्युरी पाम...

पूर्वी दक्षिण व दक्षिणपूर्व आशियामध्ये या ताडाची पाने हस्तलिखितासाठी वापरली जात असत. फिलिपाईन्समध्ये या ताडाला बुरी किंवा बुखी या नावाने ओळखले जाते. याची पाने घराचे छत शाकारण्यासाठी वापरली जातात. ताडामधून येणाऱ्या रसापासून वाईन बनवली जाते. याची पाने हस्तलिखितासाठी वापरता येतात. पावसाळ्यामध्ये स्थानिक लोक ताडाच्या पानांची छत्री करून वापरतात. अरब देशांमध्ये याच्या कठीण बियांपासून गळ्यामध्ये अलंकार म्हणून घालण्याच्या माळा बनवल्या जातात.

सेंच्युरी पाम या वनस्पतीचे कोरिफा अम्ब्राकुलीफ्लोरा असे शास्त्रीय नाव आहे. सेंच्युरीऑन ट्री, तालेपाम, तालापॉटपाम, ताडपत्री अशा विविध नावांनी तो ओळखला जातो. जगात आशिया व ऑस्ट्रेलिया खंडात कोरिफाच्या पाच प्रजाती आढळतात. त्यातील तीन प्रजाती भारतात आढळतात. कोरिफा अम्ब्राकुलीफ्लोरा हा एक देखणा विशाल ताड आहे. तो दक्षिण भारतातील घनदाट जंगलांमध्ये वाढतो. उडुपीजवळील याना येथील जंगलांमध्ये याचे अनेक वृक्ष पाहावयास मिळतात. या ताडाच्या 'सेंच्युरी पाम' या इंग्रजी नावावरून याचे आयुष्य शंभर वर्षे आहे, असा समज आढळतो.

प्रत्यक्षात या ताडाच्या वेगवेगळ्या प्रजातींचे आयुष्य २५ ते ८० वर्षांपर्यंत असते. या वृक्षाची पूर्ण वाढ झाल्यानंतर त्याला २५ ते ८० वर्षांमध्ये केव्हाही फुलोरा येतो. हा फुलोरा वनस्पती विश्वातील सर्वात मोठा मानला जातो. तो ४ बाय ४ मीटर एवढा असतो आणि त्यामध्ये लाखो फुले बहरतात. त्याच्या बिया तयार झाल्यानंतर वृक्ष वठून जातो. याला मोनोकार्पी असे म्हणतात. १९९८ मध्ये सावंतवाडी येथील सेंच्युरी पामला फुलोरा आला होता. त्यावर्षी त्याच्या बिया गोळा करून शिवाजी विद्यापीठ आणल्या गेल्या. विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या लीड बॉटेनिकल गार्डनमध्ये त्यांची रोपे तयार करण्यात आली. त्यांचे बागेत रोपण करण्यात आले. यावर्षी त्या ताडांपैकी एक वृक्ष आज तब्बल २४ वर्षांनंतर फुलोऱ्याला आला आहे, असे डॉ. यादव यांनी सांगितले.

02 SEP 2022 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आता दूरशिक्षण केंद्रातून घेता येणार 'दुहेरी पदवी'

## डी. के. मोरे : विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दूरशिक्षण पद्धतीने दुहेरी पदवी घेण्याची सुविधा शिवाजी विद्यापीठाच्या दूरस्थ (दूरशिक्षण) आणि ऑनलाइन शिक्षण केंद्रामार्फत दिली जाणार आहे. त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी गुरुवारी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरस्थ आणि ऑनलाइन शिक्षण केंद्रामार्फत आयोजित केलेल्या प्रवेश प्रक्रियेबाबतच्या बैठकीत डॉ. मोरे बोलत होते. यावेळी उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे, सी. ए. कोतमिरे, आदी उपस्थित होते.

विद्यापीठ अनुदान आयोगाने दूरस्थ आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या सर्व बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) आणि एम.बी.ए. अशा एकूण बारा अभ्यासक्रमांना मान्यता दिली आहे. ही संधी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीच्या अभ्यासक्रमापासून लागू आहे. यामुळे पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना दुसऱ्या विषयाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचीही निवड करता येईल. विषय निवडण्याची कोणतीही सक्ती विद्यार्थ्यांवर असणार नाही, अशी माहिती डॉ. मोरे यांनी दिली.

### अभ्यासक्रम प्रत्यक्ष उपस्थितीतून करता येईल

दोन्ही अभ्यासक्रम विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थितीच्या माध्यमातून पूर्ण करू शकतील. एक अभ्यासक्रम प्रत्यक्ष वर्ग उपस्थिती आणि दुसरा अभ्यासक्रम मुक्त (ओपन) किंवा दूरशिक्षणातील अथवा ऑनलाईन स्वरुपातीलही असू शकतो. दोन्ही अभ्यासक्रम ऑनलाईनही किंवा मुक्त अथवा दूरशिक्षण पद्धतीतीलही असू शकतात, असे डॉ. मोरे यांनी सांगितले.

लोकमत

# इतिहास परिषदेचे कदम आज कोल्हापुरात

कोल्हापूर : भारतीय इतिहास संशोधन परिषदेचे सदस्य सचिव डॉ. उमेश अशोक कदम हे पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्यांदाच कोल्हापुरात आज, शुक्रवारी येणार आहेत. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्यासमवेत त्यांची दुपारी १२ वाजता बैठक होणार आहे. मराठा इतिहास तसेच स्थानिक इतिहासातील संदर्भांचे अनुषंगाने त्यांची चर्चा होईल. डॉ. कदम हे कोल्हापूरचे सुपुत्र असून ते शिवाजी विद्यापीठाचे पदवीधर आहेत. पुढे त्यांनी पुणे विद्यापीठातून शिक्षण घेतले. नवी दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे त्यांनी अधिष्ठाता पद भूषविले आहे. त्यांनी मराठा साम्राज्याच्या इतिहासावर देश-विदेशात व्याख्याने दिली आहेत.

जनसंपर्क कक्ष
02 SEP 2022 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण पद्धतीने दुहेरी पदवीचा लाभ घ्यावा : डॉ. मोरे

## दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत प्रवेश प्रक्रिया बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण पद्धतीने दुहेरी पदवीचा लाभ शिवाजी विद्यापीठाच्या दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत घ्यावा, असे आवाहन संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत आयोजित प्रवेश प्रक्रिया बैठकीत डॉ. मोरे बोलत होते. यावेळी उपकुलसचिव डॉ.एन.जे.बनसोडे, सी.ए. कोतमिरे, समन्वयक आदी उपस्थित होते. डॉ. मोरे म्हणाले, विद्यापीठ अनुदान आयोगाने दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या सर्व बी. ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) व एम.बी.ए. अशा एकूण बारा अभ्यासक्रमांना मान्यता दिली आहे. त्यामुळे याचा फायदा विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार, शेतकरी, उद्योजक, सैनिक, बंदीजन यांच्याबरोबरच नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही होणार आहे.

यूजीसीने नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार विद्यार्थ्यांना एकाचवेळी अनेक कौशल्ये संपादन करण्यासाठी तयार केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एकाच वेळी पदविका व पदवी, अथवा दोन पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित होता येणार आहे. ही संधी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीच्या अभ्यासक्रमापासून लागू आहे. यामुळे पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना दुसऱ्या विषयाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचीही निवड करता येईल. विषय निवडण्याची कोणतीही सक्ती विद्यार्थ्यांवर असणार नाही.

### विद्यार्थ्यांनी संधीचा फायदा घ्यावा

दोन्ही अभ्यासक्रम विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थितीच्या माध्यमातून शिकू शकतो. एक अभ्यासक्रम प्रत्यक्ष वर्ग उपस्थिती व दुसरा अभ्यासक्रम मुक्त किंवा दूरशिक्षणातील अथवा ऑनलाईन स्वरूपातील असू शकतो. दोन्ही अभ्यासक्रम ऑनलाईन असू शकतात. किंवा दोन्ही मुक्त वा दूरशिक्षण पद्धतीतील असू शकतात. त्यामुळे या संधीचा फायदा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन डॉ. मोरे यांनी केले आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

पुढारी

# विद्यापीठाकडून उन्हाळी सत्र २२० परीक्षांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्र परीक्षेंतर्गत गुरुवारपर्यंत सुमारे २२० परीक्षांचे निकाल घोषित केले आहेत.

विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षांना प्रारंभ झाला आहे. एम.आर्कि., एम.लॉ., पीजी डिप्लोमा इन बँकिंग या विषयांचे निकाल जाहीर झाले आहेत. दरम्यान, गुरुवारी बी.ए., एम.ए, एम.बी.ए. या विषयांच्या परीक्षा झाल्या. ८१७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर परीक्षा प्रमाद समितीमार्फत नियमानुसार कारवाई केली जाणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.अजितसिंह जाधव यांनी दिली.

0 2 SEP 2022 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रेशीम शेतकऱ्यांना कळणार कोशाची गुणवत्ता

## मोटारवर चालणारे यंत्र विद्यापीठात दाखल : रेशीमशेतीला बळ मिळणार

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

जिल्ह्यात रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढत आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने रेशीमशास्त्र पदविका व पदवी अभ्यासक्रम सुरू केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या रेशीम शेतीला विज्ञानाची जोड मिळाली आहे. शेतकऱ्यांनी तयार केलेल्या कोशाची गुणवत्ता तपासण्यासाठी विद्यापीठाने मोटारवर चालणारे यंत्र आणले आहे. या यंत्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांना त्यांच्याकडील कोशातील रेशीमची गुणवत्ता व



**कोल्हापूर : मोटारवर चालणाऱ्या यंत्राचे लोकार्पण करताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. अशिष देशमुख, डॉ. ए.**

वजन कळणार आहे.

शेतकऱ्यांच्या बांधावर जावून रेशीमशेतीविषयी प्रशिक्षण देणे. शेतीतील किड नियंत्रणात आणण्यासाठी प्रयोगशाळेच्या माध्यमातून कोणती औषध फवारणी करावी, याबद्दल मार्गदर्शन केले जाते. उत्तम प्रतिच्या रेशीमधाग्याला एक किलोमागे किमान ४५०० ते ५००० हजार रूपये मिळतात. प्रायोगिक तत्वावर हे यंत्र काही शेतकऱ्यांना दिले जाईल, हा प्रयोग यशस्वी झाला तर अन्य शेतकऱ्यांनाही यंत्र पुरवठा केला जाईल. याची किंमत १५ हजार रूपये आहे. असे विद्यापीठातील रेशीमशास्त्र अभ्यासक्रम समन्वयक डॉ. ए. डी. जाधव यांनी सांगितले. या यंत्राचा लोकार्पण सोहळा प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. अशिष देशमुख, प्रा. कांबळे, प्रा. बजरंग कुंभार, प्रा. माधुरी वाळवेकर, तेजस बोदगिरे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
02 SEP 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षणद्वारे एकाचवेळी दुहेरी पदवी घेण्याची संधी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण पद्धतीने दुहेरी पदवीचा लाभ दूरस्थ आणि ऑनलाइन शिक्षण केंद्रामार्फत घ्यावा, असे आवाहन दूरशिक्षणचे संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी केले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरस्थ आणि ऑनलाइन शिक्षण केंद्रामार्फत आयोजित प्रवेश प्रक्रिया बैठकीत ते बोलत होते. डॉ. मोरे म्हणाले, विद्यापीठ अनुदान आयोगाने दूरस्थ आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या सर्व बी. ए., बी. कॉम., एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी. (गणित) आणि एम. बी. ए. एकूण बारा अभ्यासक्रमांना मान्यता दिली. त्यामुळे याचा फायदा विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार यांच्याबरोबरच नियमित शिक्षण घेणाऱ्यांना होणार आहे.

- दूरशिक्षणचे संचालक डॉ. डी. के. मोरे यांची माहिती
- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नवीन धोरणांचा नियमित विद्यार्थ्यांना फायदा

विद्यापीठ अनुदान आयोगाने नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना एकाच वेळी अनेक कौशल्ये संपादन करण्याची संधी दिली आहे. पदविका आणि पदवी, अथवा दोन पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित होता येणार आहे. ही संधी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीच्या अभ्यासक्रमापासून लागू आहे. यामुळे पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना दुसऱ्या विषयाच्या



## दुहेरी पदवीचे निकष

दोन्ही अभ्यासक्रम विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थितीच्या माध्यमातून शिकू शकतो. एक अभ्यासक्रम प्रत्यक्ष उपस्थिती आणि दुसरा ऑनलाईन स्वरुपातीलही असू शकतो. तसेच दोन्ही अभ्यासक्रम ऑनलाईनही असू शकतात. दोन्ही मुक्त वा दूरशिक्षण पद्धतीतही असू शकतात. त्यामुळे या संधीचा फायदा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचीही निवड करता येईल. विद्यापीठ अनुदान आयोगानुसार विषय निवडण्याची कोणतीही सक्ती विद्यार्थ्यांवर असणार नाही.

तरूण भारत

# इतिहास संशोधन परिषदेचे डॉ. उमेश कदम आज कोल्हापुरात

कोल्हापूर : भारत सरकारच्या शिक्षण विभागांतर्गत



भारतीय इतिहास संशोधन परिषदेचे सचिव डॉ. उमेश कदम प्रथमच कोल्हापुरात आज ( दि. २) येत आहेत. कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के यांच्याबरोबर दुपारी १२ वाजता बैठक होणार आहे. मराठा इतिहास, स्थानिक इतिहासातील संदर्भावर चर्चा होईल. विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज सेंटर ऑफ स्टडीज फॉर मराठा हिस्ट्री या केंद्रातील मोडी लिपीतील कागदपत्रातून इतिहासाची नवी दालने खुली करण्याच्या अनुषंगाने चर्चा होईल. डिजिटल प्लॅटफॉर्म लायब्ररी ही नवी संकल्पना, मातृभाषा, स्थानिक भाषा, देशी भाषा आणि जन भाषा या चतु:सूत्रीच्या आधारे इतिहास जनसामान्यांपर्यंत अधिक परिणामकारकरित्या पोहचविण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. डॉ. कदम यांचे शिवाजी विद्यापीठ व पुणे विद्यापीठातून शिक्षण झाले. मराठा साम्राज्याच्या इतिहासावर व्याख्याने आणि शोधनिबंध सादर केले आहेत. मराठा आणि फ्रेंच यांच्यातील संबंधांवर त्यांनी पुस्तक लिहले आहे.